अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ०२/ २०१२.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०७-०७-२०१२.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक ०२ , दिनांक ११-०७-२०१२.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती...............................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा बुधवार दिनांक ११-०७-२०१२ रोजी दुपारी १-०० वाजता माळीवाडा येथील **"जुने महानगरपालिका सभागृहात "** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय सूची.
२. प्रस्तावाची टिप्पणी.
३. ३३ मा.नगरसेवक यांची यादी.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक ०२ बुधवार दिनांक ११ / ०७ /२०१२ रोजी दुपारी १-०० वाजता होणा-या मा.खास सभेची विषय पत्रिका.

---*---

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| १२ | अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती करीता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट तसेच ३३ मा.नगरसेवक व मा.स्थायी समितीचे चार मा.सदस्य यांचे प्राप्त झालेले निवेदन. |
| १३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीत पारगमन शुल्क वसुलीकामी ठरविलेल्या देकार रक्कम रु.१,४४,७५,८७०/- मा.स्थायी समितीच्या निर्णयास अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात दिनांक ०१/०७/२०१२ पासून मे विपुल ऑक्ट्रॉय सेंटर यांना पारगमन शुल्क वसुलीचा ठेका देणे व ठेक्याचा कालावधी ठरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट तसेच ३३ मा.नगरसेवक व मा.स्थायी समितीचे चार मा.सदस्य यांचे पारगमन वसुली करणे कामी निविदा मागविणे बाबत प्राप्त झालेले निवेदन निर्णयास्तव. |
| १४ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : ०७ / ०७ /२०१२.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १२** **दिनांक : ११/०७/२०१२**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती करीता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट तसेच ३३ मा.नगरसेवक व मा.स्थायी समितीचे चार मा.सदस्य यांचे प्राप्त झालेले निवेदन.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-**

ई- निविदा क्रमांक २५९ एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती बाबत.

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यांत येत आहे.

१) प्रशासकीय मान्यता- मा.आयुक्त यांची दि. २१/०१/२०१२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त
२) ऑनलाईन ई- निविदा क्रमांक- २५९ सन २०१२-२०१३
३) निविदा विक्री कालावधी दि.१८/०५/२०१२ ते दि. २५/०५/२०१२
४) निविदा स्विकारण्याची तारीख ०२/०६/२०१२
५) निविदा उघडण्याची तारीख ०४/०६/२०१२
६) कामाची मुदत १८ महिने

प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | आर्क असोसिएट्स, औरंगाबाद | ३.३३% + सर्व्हिस टॅक्स |
| २ | महेंद्र दवे ॲण्ड असोसिएट्स,अकोला | ३.९९% |
| ३ | सिमा कंन्सलटंट, औरंगाबाद | ४.१३% + सर्व्हिस टॅक्स |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषगांने आर्क असोसिएट्स, औरंगाबाद यांचा देकार सर्वात कमी म्हणजे ३.३३%+ सर्व्हीस टॅक्स इतका आहे. सदरचे दर अवाजवी असल्यामुळे संबंधीत निविदा धारक आर्क असोसिएट्स यांना दराचे वाटाघाटी करीता प्रकल्प विभाग जा.क्र.११ दिनांक ४०/६/२०१२ अन्वये पत्र दिले असता आर्क असोसिएट्स यांनी सदरचे काम २.७५% + सर्व्हीस टॅक्स या दराने करणेस तयार असले बाबत दि.०५/०६/२०१२ पत्रान्वये कळविले आहे.

त्यानुसार सदर बाबत तुलनात्मक तक्ता व अहवाल दिनांक ५/६/२०१२ छाननी समिती समोर सादर केला असता मा.छाननी समितीने आर्क असोसिएट्स , औरंगाबाद यांची निविदा मधील देकार २.७५%+ सर्व्हिस टॅक्स या दराने करण्याची शिफारस केली आहे.

तरी मा. छाननी समितीने केलेल्या शिफारशी नुसार आर्क असोसिएट्स , औरंगाबाद यांची निविदा व त्यांनी नमुद केलेला देकार २.७५%+ सर्व्हिस टॅक्स मंजुरीस्तव सविनय सादर. तसेच सदरचा प्रस्ताव मंजुरीस्तव मा.स्थायी समितीकडे सादर करणेबाबत मंजुरीस्तव.

यावर मा.मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावित

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्रयाय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा. आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त सोा, मा.उपायुक्त , मा.मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्रायासह मा.स्थायी समिती पुढे निर्णयासाठी सादर.

तथापि यासंदर्भामध्ये सदरचे प्रस्तावाबाबत ३३ मा. नगरसेवकांचे मा. महापौर व मा.आयुक्त साहेब यांना दिलेले दिनांक २/७/२०१२ रोजीचे निवेदन तसेच मा.स्थायी समितीचे चार सदस्य यांचे पत्र व मा.आयुक्त साहेब यांचे जा.क्र.साप्रवि ६०७ दिनांक ५/७/२०१२ अन्वये नगरसचिव विभागाकडेस पत्र त्यानुसार नगरसचिव यांनी मा.महापौर सो. यांचेकडेस मा.स्थायी समितीकडील निर्णयासाठी पाठविलेले सदरचे प्रस्ताव मा.महासभेमध्ये निर्णय घेणेकामी मा. महासभा बोलविणे करीता आदेश होणे कामी दिनांक ०७/०७/२०१२रोजी सादर केला तो पुढीलप्रमाणे

***

अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर
नगरसचिव विभाग दिनांक७/७/२०१२

प्रति,
मा. महापौर साहेब,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC)नियुक्तीकरिता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. **व** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत पारगमन शुल्क वसुलीकामी दिनांक १/७/२०१२ पासून मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर यांना पारगमन शुल्क वसुलीकामी मा.स्थायी समितीच्या निर्णयास अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात दिलेला आहे.व पारगमन शुल्क वसुली ठेक्याबाबत मा.विद्यमान ३३नगरसेवक व मा.स्थायी समितीचे चार सदस्य यांनी सदर बाबतीत चर्चा करण्यासाठी विशेष महासभेची मागणी केलेली आहे.त्याअनुषंगाने सदरची बाब ही महानगरपालिकेच्या आर्थिक हितसंबंधाची असल्याने विशेष सभा सदर प्रस्तावात व निर्णयासाठी घेणे बाबत...

संदर्भ :- १] मा.सौ. गितांजली काळे, उपमहापौर व इतर ३२ मा. नगरसेवक यांचे दिनांक २/७/२०१२ रोजीचे निवेदन.
२] मा.स्थायी समितीच्या चार सदस्यांचे दिनांक ०२/०७/२०१२ रोजीचे पत्र.
३] मा.आयुक्त साहेब ,अ.नगर मनपा यांचे जा.क्र. साप्रवि ६०७ दिनांक ५/७/२०१२ चे पत्र

सादर,

उपरोक्त विषयाचे संदर्भानुसार विनंती अहवाल देण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती करिता मागविण्यांत आलेल्या निविदाचा दराचा

तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. <u>**व**</u> अहमदनगर महानगरपालिका हद्दीत पारगमन शुल्क वसुलीकामी ठरविलेल्या रकमेस दिनांक १/७/२०१२ पासून मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर यांना पारगमन शुल्क वसुली ठेका देणे व ठेक्याचा कालावधी ठरविणेबाबतचे विषय निर्णयासाठी मा. स्थायी समितीकडे आलेले आहेत. परंतु याबाबत महानगरपालिकेच्या ३३ नगरसेवक यांनी PMC नेमणे बाबतचा तुलनात्मक तक्त्याचा प्रस्ताव कालबध्द स्वरुपाचा असल्याने या बाबत लवकरात लवकर निर्णय घेणे अपेक्षित आहे तसेच पारगमन फी वसुली करणे कामी अभिकर्ता नियुक्त करणे महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्याकरीता निविदा मागविणे बाबत कार्यवाही केल्यास पारदर्शकता निर्माण होवून यामध्ये स्पर्धा होणार आहे. यातून महानगरपालिकेचे उत्पन्नात निश्चित वाढ होईल अशी अपेक्षा आहे. याकरीता निविदा मागविणे बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.महासभेपुढे पाठविण्याबाबतचे निवेदनाची प्रत इकडेस दिलेली आहे.

मा.शासनाचे अर्थ सहाय्य असलेली महत्वपुर्ण एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती करिता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्त्याबाबत योग्य तो निर्णय तातडीने होणे अत्यावश्यक आहे. सदरची योजना ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे विहित मुदतीत पुर्ण करणे हे महानगरपालिकेवर बंधनकारक आहे तथापि विहित मुदतीत केंद्र शासनाचे अनुदान अथवा सवलती महानगरपालिकेस मिळण्यासाठी व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्याकरीता तसेच पारगमन शुल्क वसुली बाबत योग्य तो निर्णय तातडीने होणे अत्यावश्यक आहे. उपरोक्त दोन्ही बाबी या महानगरपालिकेच्या आर्थिक हितसंबंधाशी निगडीत आहे. व त्यावर तातडीने निर्णय होणे गरजेचे आहे. तथापि दोन्ही विषयाबाबतची चर्चा ही मा.स्थायी समितीकडे होणे आवश्यक व गरजेचे आहे. तथापि मा.स्थायी समितीचे दिनांक १/७/२०१२ पासून ८(आठ) सदस्य निवृत्त झालेले आहेत. व मा.स्थायी समितीच्या रिक्तपदी आठ सदस्यांची नियुक्ती करणे व तद्नंतर मा.सभापतीची निवड होणे बाकी असलेने मा.स्थायी समितीचे कामकाज पुर्ववत होणेसाठी बराच कालावधी लागणार आहे. वरील दोनही विषयाबाबत तातडीने चर्चा करण्यासाठी व योग्य तो निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेच्या ३३ मा.नगरसेवकांनी व मा.स्थायी समितीच्या चार सदस्यांनी विशेष महासभेची मागणी केलेली आहे. त्याबाबत चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्याची मागणी केलेली आहे. उपरोक्त सर्व बाबींचा सर्व निकष व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" प्रकरण दोन मधील तरतुदीनुसार मा. महानगरपालिकेचे कामकाज, कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी कलम (ड) मधील तरतुदीनुसार सदरचे दोनही प्रस्ताव मा.महासभेमध्ये घेणे बाबत आदेश होणेस विनंती आहे. तरी याबाबत मा.महासभा काढणे विषयी तारीख व वेळ मिळणे बाबत विनंती आहे

यावर मा.महापौर सोा. यांचा आदेश की, बुधवार दिनांक ११/७/२०१२ रोजी दुपारी १.०० वा. सदर दोनही विषयासाठी मा. विशेष सर्वसाधारण सभा काढण्यात यावी.

**चर्चा :-**

**मा.श्री दिलीप सातपुते :-** मा.न्यायालयाच्या आदेशानुसार नियुक्त झालेले नगरसेवक मा.श्री संभाजी कदम यांचा सभागृहाच्या वतीने सत्कार करण्यांत यावा.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे** : नविन प्रशासकीय इमारतीमधील सभागृहाचे नुतनीकरणाचे काम ब-याच दिवसापासून चालू आहे.पुढील सर्वसाधारण सभा नविन प्रशासकीय इमारतीतील सभागृहात घेण्यांत यावी.

**मा.श्रीमती. खरमाळे संगीता** : श्री.बोराटे यांनी मांडलेल्या सूचनेस मी अनुमोदन देत आहे.

**मा.श्री. दिलीप सातपुते** : केडगांव विभागातील पाणी प्रश्न अत्यंत गंभीर झालेला असून सदर प्रश्नाबाबत मागील सर्व साधारण सभेमध्ये विषय घेण्यांत आलेला होता. सदर कामास मुदत वाढ दिलेली नाही. सहा महिन्या पूर्वी सदर कामाबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. पाणी योजनेच्या कामास मुदत वाढ देण्यांत यावे.

**मा.महापौर** : प्रथम विषय पत्रिकेवरील विषय घेण्यांत यावे.

**मा.श्री. निखील वारे** : आजच्या खास सभेचा जो अजेंडा देण्यात आला आहे. तो योग्य प्रकारे नाही.त्यामध्ये विषय व टिप्पणी वेगवेगळी देण्यांत आलेली आहे. सदर चूक हि प्रशासनाची आहे. पुन्हा अशा प्रकारे चूक होणार नाही. या बाबत नोंद घेण्यात यावी.

**मा.श्री. निखील वारे** : आजची बोलावण्यांत आलेली सभा कोणत्या नियमाचे आधारे बोलावलेली आहे.

**नगरसचिव** : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम ड अन्वये आजची सभा घेण्यांत आलेली आहे. मा.महापौरांच्या आदेशान्वये सभा घेतलेली आहे.

**मा.श्री.निखील वारे** : मा.स्थायी समितीचा अधिकार असतांना आजचे विषय यासभेत कसे घेतले मा.स्थायी समितीची निवडणुक घेवून सदरचे विषय स्थायी समितीत घेणे आवश्यक होते. आजच्या सभेतील विषय जनरल बोर्डात घेतल्याने मा.स्थायी समितीच्या हक्कावर गदा आणलेली आहे. पीएमसी नेमणुकी बाबत आजचे विषय घेणे बाबत एवढी काय तातडी निघाली.

**मा.श्रीमती. संगीता खरमाळे** : मनपा हद्यीत आयात होणा-या मालावार आकारण्यांत येणारी जकात बंद होवून त्या ऐवजी स्थानिक संस्था कर लागू होणार आहे. स्थायी समिती अस्तित्वात असतांना आजचे विषय मा.स्थायी समितीपुढे का घेतले गेले नाहीत.

**मा.श्री. सचिन पारखी** :मा. स्थायी समितीच्या हक्कावर गदा आणलेली नाही.

**मा.श्री. निखील वारे** : स्थायी समिती अस्तित्वात असतांना आजचे हे विषय का घेतले.

**मा.श्री.संग्राम जगताप** : श्री वारे यांनी मांडलेले म्हणणे बरोबर आहे. मा.स्थायी समिती असतांना सभेत विषय का घेतले गेले. विषयाची तातडीची गरज होती तर मा.स्थायी समिती अस्तित्वात असतांना त्यावेळी समिती समोर विषय का घेतले गेल नाहीत.

**मा.श्री.निखील वारे** : या पुढेही मा.स्थायी समितीचे विषय सभेत घेण्यांत येवू नयेत.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे** : एकात्मीक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास योजने अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुकी बाबत माहिती देण्यांत यावी.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे** : एकात्मिक गृह झोपडपट्टी विकास अंतर्गत बांधवयाच्या घरकुलाच्या जागा येणे झालेल्या नाहीत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे** : ज्या ठिकाणी प्रकल्प राबवयाचे आहे त्या जागा येणे झालेल्या नसतांना काम कसे करणार आजचा विषय मंजूरीसाठी कसा घेतला गेला.

**मा.श्री.निखीर वारे** : केंद्र शासनाच्या निधीमधून मंजूर झालेल्या कोणत्याही योजनाच्या जागेत २०ं टक्के जागेवर काम करता येते. काम चालू असतांना येणे करणे बाबत कार्यवाही करता येईल.

**मा.श्री.किशोर डागवाले** : मा.स्थायी समिती कडील विषय असतांना सभेत कसे घेतले गेले. जागा येणे नसतांना प्रकल्पास मंजूरी कशी मिळाली.

**मा.आयुक्त सो** : आजच्या सभेत घेतलेले विषय हे मा.स्थायी समिती कडील विषय होते. मध्यंतरीच्या काळात मा.स्थायी समिती कडील आठ सदस्य निवृत्त झालेले आहेत. मा.स्थायी समिती कडील विषय महानगरपालिका सभेपुढे घेता येतात. तसे मा.महापौरांना अधिकार आहेत. महापौर हे सभेचे पिठासीन अधिकारी असतात. मी अहमदनगर महानगरपालिकेचा पदभार स्विकारल्यानंतर आय.एच.एस.डी.पी. बाबत तीन बैठका घेतल्या. त्यावेळी लक्षात आले कि. सदर प्रकल्प राबवयाच्या जागा येणे झालेल्या नाहीत. शासकीय भूखंडावर योजना राबवितांना त्या येणे झालेल्या नसल्या तरी मंजूरीची प्रक्रिया व येणे करण्याची प्रक्रिया एका वेळी करता येते.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे** : यापूर्वी अहमदनगर महानगरपलिका हद्दीमध्ये बरेच मोठमोठया कामा करिता पी.एम.सी. म्हणून चांगल्या चांगल्या संस्थेची नेमणुक केलेली होती. यापूर्वी त्याचा कामाचा अनुभव पाहिला तर कुठल्याही पीएमसी संस्थेने चांगल्या प्रकारे महानगरपालिकेस सहकार्य केलेले नाहीत. त्यांच्यावर खूप मोठया प्रमाणावर खर्च झालेला आहे. पण कुठलेही प्रकल्प योग्य प्रकारे पूर्ण झालेले नाहीत. त्याचा मागचा अनुभव पाहता या कामा करिता पीएमसी नेमणुक मनपा मार्फत नविन इंजिनिअर भरती करण्यांत यावी. त्याच्याकडून काम करून घेण्यात यावे. पीएमसीचा या पूर्वीचा अनुभव वाईट आहे.

**मा.श्री.निखील वारे** : आजचे विषय तातडीने घेण्याची एवढी आर्जंशी काय आहे. पीएमसीचा मागील अनुभव चांगला नसतांना पीएमसी नेमणुकी बाबत आत्ताच एवढी घाई का

**मा.श्री.संग्राम जगताप** : पीएमसी नेमणुकी बाबत विषय का घेतला गेला.

**मा.श्री. बाळासाहेब पवार** : मागील काळात आठ सदस्यांवर किती तरी दिवस मा.स्थायी समितीचे कामकाज चालु होते. मग आत्ताच मा.स्थायी समितीचे विषय सभेपुढे का घेतले गेले.

**मा.श्री. संग्राम जगताप** : बालिकाश्रम रस्ता हा मंजूर असूनही त्यावर पीएमसी नेमणुक केली गेली नाही.

**मा.श्री. किशोर डागवाले** : अहमदनगर शहरात राबविण्यांत येत असलेल्या पाणी पुरवठा योजना फेज-२ मध्ये ज्या एजन्सीला काम दिलेले आहे. त्यांच्या कामाचा अनुभव काय आहे. त्या बाबतचा पाणी पुरवठा विभागाचा अहवाल काय आहे.

**मा.आयुक्त साो**. : शहर पाणी पुरवठा फेज-२ बाबत बैठक घेतलेली आहे. पीएमसीने कामाबाबत रिपोर्ट दिलेला नाही .पीएमसीचे जे काही मुद्दे होते अडचणी होत्या त्या जाणून घेतलेल्या आहेत. प्रशासन व पीएमसी यांचे कामामध्ये कोओर्डीनेशन दिसून आलेले नाही. पीएमसीचे प्रत्येक कामावर सुपरव्हिजन करणे आवश्यक आहे. त्यांना शेवटची संधी दिलेली आहे.

**मा.श्री. विनीत पाउलबुधे** : मनपा शहर हद्दीत राबविण्यांत येत असलेल्या पाणी पुरवठा योजना फेज-२ च्या कामास ठरवून दिलेल्या मुदती पेक्षा जास्त कालावधी होत आहे. त्यास जबाबदार कोण सदर कामाची मुदत संपवून बराच काळ झालेला आहे. पीएमसीचे काम समाधानकारक नाही. त्यांना ठरवून

दिलेल्या बारचार्ट प्रमाणे काम झालेले नाही. सदर एजन्सीने दोन वर्षाच्या काळात २५ टक्के काम केलेले आहे. बाकी काम कधी करणार पीएमसी का नेमवयाची स्थायी समिती अस्तित्वात असतांना हा विषय का आला नाही. आजच्या सभेत हा विषय का घेतला गेला.

**मा.आयुक्त सो.**: आजच्या सभेपुढे घेतलेले हे विषय मा.स्थायी समितीकडे मंजूरीसाठी दिलेले होते. सदर विषयांची आर्जंशी असल्यामुळे मा.महापौरांनी सभेपुढे घेतलेले आहे.

**मा.श्री. संग्राम जगताप** : आजचा पीएमसी नेमणुकीबाबतचा विषय तहकूब करण्यांत यावा.

**मा.श्रीमती. संगीता खरमाळे** : अहमदनगर शहरात राबविण्यांत येत असलेल्या शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ चे कामी केंद्र सरकारचा ८० टक्के निधी, राज्य सरकारचा १० टक्के व मनपा १० टक्के निधी असंताना काम चांगल्या प्रकारे झालेले नाही. सदरचे काम हे वेळेत पूर्ण होवू शकलेले नाही. आतापर्यत किती काम झाले व संबधीतांना सदर कामापोटी किती बीले अदा केलेली आहे.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे** : मा.आयुक्तांच्या वक्तव्यानुसार हा विषय घेण्याचा अधिकार मा.महापौरांचा आहे. हा विषय आजच्या सभेत का घेतला.

**मा.श्रीमती. गितांजी काळे उपमहापौर** : आजच्या पीएमसी नेमणुकी बाबतच्या विषयी प्रत्येक सदस्याने आपले मत मांडावे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे** : पीएमसी नेमणुक करतांना सर्व्हीस टॅक्स भरण्यात आलेला आहे. तो कोणी अदा करावयाचा आहे.

**श्री. निकम पा.पु.** : शहर पाणी पुरवठा फेज-२ चे कामा संदर्भात रक्कम रू.२४.७५ कोटी संबधीतांना अदा केलेले आहे. सदर योजनेचे काम ३७ टक्के पूर्ण झालेले आहे.

**श्री. मेहत्रे,** कनिष्ठ अभियंता : पीएमसी नेमणुकी बाबत टेंडर काढत्यावेळी सर्व्हीस टॅक्सची अट टाकण्यांत आलेली आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे** : नियमाप्रमाणे सर्व्हीस टॅक्स भरण्याची जबाबदारी कोणाची आहे.

श्री मेहत्रे : संबधीत एजन्सीने निवीदा भरतांना त्यांनी दर दिलेले आहे. जागा देणेची जबाबदारी संबधीत पीएमसीची आहे. जागा येणे झालेली नाही. या प्रस्तावास मा.शासनाची मंजूरी मिळालेली आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे** : सदर कामा संदर्भात पीएमसी नेमण्यात येवू नये. नविन लोकांना काम करण्याची संधी देण्यात यावी. सदर पीएमसी नेमणुकी बाबतच्या विषयास आमचा विरोध नोंदवावा.

**मा.श्री.संग्राम जगताप / मा.श्री निखील वारे** : पीएमसी नेमणुकी बाबत बहुमताने निर्णय घ्यावा.

**मा.श्री.संभाजी कदम** : पीएमसी नेमणुकी बाबतचे २.५० टक्के निधी केंद्र सरकार देणार आहे. त्याचा सर्व्हीस टॅक्स कमी करा. सर्व्हीस टॅक्स भरण्याची प्रथा पाडू नका. टॅक्स अट कमी करावी.

**मा.श्री. निखील वारे / मा.श्री. संग्राम जगताप / मा.श्री. विनीत पाअुलबुधे / मा.श्री. बाळासाहेब पवार / मा.श्री.शेख आरिफ :** सदर विषयाबाबत पीएमसी नेमणुक करावी किंवा कसे या बाबत मतदान करून ठरवावे.

**मा.श्री.किशोर डागवाले** : सदर विषय संदर्भा बाबत पीएमसी नेमणुक करण्यांत येवू नये. सदर विषयास आमचा विरोध नोंदवावा.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे** : या पूर्वी ही मनपा मार्फत राबविण्यांत आलेल्या मोठमोठया प्रकल्पांना पीएमसी नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांचा मागील कामकाजाचा अनुभव वाईट आहे. आजपर्यत एकही काम चांगले झालेले नाही.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे** : अहमदनगर शहरात राबवयाच्या एकात्मिक गृह निर्माण प्रकल्प करिता पीएमसी नेमणुकी बाबतचा विषय मा.स्थायी समितीत ठेवण्यात यावा.

**मा.महापौर** : सदरचा विषय अतिशय तातडीचा असल्यामुळे मा.सदस्यांच्या मागणीनुसार मा.सभेपुढे मंजूरीसाठी घेण्यांत आलेला होता. सदर विषया बाबतचे सन्माननीय सदस्याची सभागृहातील भावना लक्षात घेता सदरचा विषय मा.स्थायी समिती पुढे मंजूरीसाठी घेण्यांत येईल पुढील विषय घेणेत यावा.

--*--

**ठराव :-**

ठरविण्यांत येते की, एकात्मीक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार PMC नियुक्ती करीता मागविण्यांत आलेला निविदा दराचा तुलनात्मक तक्ता या बाबतचा प्रस्ताव हा मा.शासनाच्या अर्थसहाय्याची महत्वपुर्ण व कालबध्द स्वरुपाच्या योजनेशी निगडीत बाब असल्याने ३३ मा.नगरसेवक व मा.स्थायी समितीचे ४ सदस्य यांनी निवेदन देवुन सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे घेण्याबाबत मागणी केली.

तथापि सभागृहात झालेली चर्चा व काही मा.सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना व कल विचारात घेवुन ही सभा सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णय घेणेकामी पाठविणेस मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे
अनुमोदक : मा.सौ.संगिता रत्नाकर खरमाळे
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १३** **दिनांक : ११/०७/२०१२**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत पारगमन शुल्क वसुलीकामी ठरविलेल्या देकार रक्कम रु.१,४४,७५,८७०/- मा.स्थायी समितीच्या निर्णयास अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात दिनांक ०१/०७/२०१२ पासून मे विपुल ऑक्ट्रॉय सेंटर यांना पारगमन शुल्क वसुलीचा ठेका देणे व ठेक्याचा कालावधी ठरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट तसेच ३३ मा.नगरसेवक व मा.स्थायी समितीचे चार मा.सदस्य यांचे पारगमन वसुली करणे कामी निविदा मागविणे बाबत प्राप्त झालेले निवेदन निर्णयास्तव.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-**

अहमदनगर महानगरपालिकेने २०११-१२ या वर्षामध्ये जकात व पारगमन शुल्क वसुलीचा ठेका मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर , मुंबई यांना दिनांक १/१२/२०११ ते ३०/११/२०१२ या एका वर्षाचे कालावधीकरीता देकार रक्कम रू. ८८ कोटी ५ हजार या रक्कमेवर मनपा कार्यारंभ आदेश जकात जा.क्र. १०९ दि. ३०/११/२०११ अन्वये देण्यांत आलेला आहे.

मा.शासनाकडील अधिसुचना क्र.२०११/ प्र.क्र.१३९ /नवि ३४ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधि. १९४९ मधील कलम १२७ च्या उपकलम (२) च्या खंड (ककक) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा आणी या संबंधात त्यास समर्थ करणा-या अन्य सर्व शक्तीचा वापर करुन महाराष्ट् ्शासन ड वर्गातील नमुद महापलिकांना दि. १ जुलै २०१२ पासु उपभोग , उपयोग किंवा विक्री यासाठी शहराच्या हद्दीमध्ये आयात होणा-या मालाच्या प्रवेशावर जकात किंवा उपकर याचे ऐवजी शानीक संस्था कर बसविण्याचे निर्देश देत आहे अशाबाबत अधिसुचना दि. १ जुन २०१२ रोजी महापलिकेस प्राप्त झालेली आहे.

वरील अधिसुचनेनुसार महानगरपालिकेने जकात अभिकर्ता मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर यांस पारगमन शुल्काची दैनंदीन उलाढाल बाबतची माहीती कळविण्याविषयी पत्राने कळविले असता, जकात अभिकर्त्याने पारगमन पासचे वसुलीबाबत खालील प्रमाणे महानगरपालिकेस कळविले आहे.

``आमचा आपले बरोबर जकात व पारगमन वसूलीचा करारनामा दि.१-१२-२०११ ते ३०-११-२०१२ या कालावधीसाठीचा आहे. आम्ही निविदा रक्कम भरतांना पुर्ण १२ महिन्यात येणारे लग्नसराई , दिवाळी, दसरा, ईद इ.धार्मिक सण या सर्वांचा विचार केला होता. व त्या अनुषंगाने बाजारात होणारी उलाढाल लक्षात घेतली होती.

मागील सहा महिन्यात आम्ही जकात संकलनाचे काम करीत असतांना जागतिक अर्थव्यवस्थेत आलेली मंदी व त्याचा भारतीय औद्योगिक व व्यापारी क्षेत्रात परिणाम झाल्याने अहमदनगरच्या बाजारपेठेत सुध्दा त्याचा परिणाम होवुन मालाची आवक अत्यंत घटली. परिणामी जकातीच्या उत्पन्नातही कमालीची घट निर्माण झाली. गेल्या सहा महिन्यांत विविध कारणांमुळे आमचे अंदाजे रू.९ कोटीची नुकसान झाले आहे. तसेच यापुढील काळात येणारे गणेशोत्सव , नवरात्र , मोहरम, दसरा, दिवाळी इ.धार्मिक सणांच्या काळात मालाची आवक व व्यावसायिक उलाढाल मोठया प्रमाणावर होत

असते हे सर्वज्ञात आहे. त्यामुळे या काळात जकातीच्या उत्पन्नात वाढ होवुन आमचे झालेले नुकसान काही प्रमाणात भरून निघण्यांस मदत होणांर आहे.

दि. १ जुलै २०१२ पासुन जकात बंद होत असल्याने आमच्याकडील कर्मचा-यंना नियमानुसार १ महिन्याची नोटीस न देता कामावरुन कमी करावे लागणार असल्याने १ महिन्याचा पगार रक्कम रु.२४.३० लाख द्यावा लागणार आहे. तसेच जकात कर बंद होत असल्याबाबत विविध वर्तमानपत्रांतुन बातम्या प्रसिध्द झाल्याने व्यापा-यांनी मालाची आयात थांबविली असल्याने जकात वसुलीत मोठी तुट निर्माण होऊन आमचे आतोनात नुकसान होणार आहे.

जरी शासनाने जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर लागु केला असला तरी पारगमन शुल्क वसुली चालु राहणार असल्याने आम्ही पारगमन फी वसुल करण्यांस इच्छुक असुन आम्ही सध्या वसुल असलेली पारगमन शुल्काची वसुलीची आकडेवारी सोबत जोडलेली आहे. यामध्ये आस्थापनेचा खर्च व इतर खर्चाचा समावेष नाही.

आमची आपणास अशी विनंती आहे की, आमचे झालेले आर्थिक नुकसान काही प्रमाणात भरून निघण्यासाठी आम्हांस दि.१-७-२०१२ पासुन १२ महिन्यांसाठी पारगमन शुल्क वसुलीचा ठेका उक्त विवरण पत्रातील आकडेवारी नुसार सरासरी निश्चित करून त्या मधुन आस्थापनेचा खर्च, इतर खर्च व व्यावसायिक नफा इतर खर्चाची वजावट करून देकार रक्कम निश्चित करावी.

देकार रक्कम निश्चित करून आम्हांस दि.१-७-२०१२ पासुन १२ महिन्याकरीता पारगमन वसुलीचा ठेका आम्हांस देण्यांत यावा अशी आमची आपणांस आग्रहाची विनंती आहे. याबाबतीत आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता व पुरवणी करारनामा करून देणेस आम्ही तयार आहोत.

अन्यथा आम्हांस झालेल्या नुकसान भरपाई पोटी विधी तज्ञांचे मार्गदर्शन / कायदेशीर सल्ला घेवुन योग्य त्या न्याय प्राधिकरणाकडे दाद मागावी लागेल व त्याची संपुर्ण जबाबदारी महानगरपालिकेवर राहील याची कृपया नोंद घ्यावी. आम्हांस यापुर्वी झालेल्या आर्थिक नुकसानीची आम्ही आपणास वेळोवेळी पत्राद्वारे दिली असुन ती सर्व पत्रे अवलोकनी घेणेत यावी.

तरी उक्त वस्तुस्थितींचा सारासर विचार करून व नैसर्गिक न्यायास अनुसरून आम्हांस न्याय द्यावा व आमचेवर अन्याय होणार नाही याची दक्षता घेणेत यावी हि विनंती. अशाबाबत महानगरपालिकेस पत्र दिले आहे. (सोबत ६ महिन्यातील उत्पन्नाचा तक्ता )

सदर पत्राच्या अनुषंगाने महानगरपालिकेचे मा.उच्च न्यायालयातील विधीतज्ञ यांचे मार्गदर्शन मागविले असता, त्यांनी खालील प्रमाणे अभिप्राय कळविला आहे.

महानगरपालिकेने मे.विपुल ऑक्ट्रॉय यांना जकात वसुली व पारगमन वसुलीबाबत अभिकर्ता (एजंट) म्हणुन नेमणुक कराराप्रमाणे केलेली आहे व त्याबाबतचा अलाहिदा करार विपुल ऑक्ट्राय हे महानगरपालिकेच्या वतीने जकात व पारगमन वसुली करीत आहे.

तथापि महाराष्ट्र शासनाने दिनांक १-६-२०१२ रोजी अधिसुचना जारी करून जकात कर रद्द केलेला आहे. सदरची बाब ही महानगरपालिकेने अभिकर्ता यांच्या निदर्शनास आणुन दिलेली आहे.

शासनाने जकात बंद केली असली तरी पारगमन वसुली ही चालुच राहणार आहे. महानगरपालिकेने जकात अभिकर्ता (एजंट) यांच्याबरोबर जकात वसुली व पारगमन वसुली असा संयुक्त करार केलेला आहे. महानगरपालिकस पारगमन वसुली विपुल ऑक्ट्रॉय यांच्या मार्फत करता येईल. तथापि सदरची बाब ही महानगरपालिकेच्या आर्थिक हितासंबंधी असल्याने मा.स्थायी समिती

यांची मंजुरी आवश्यक आहे. तसेच स्थायी समिती पारगमन वसुली बाबत जी रक्कम निश्चित करेल अथवा मा.स्थायी समिती जो निर्णय अथवा बंधने व अटी लागु करतील तो संपुर्ण निर्णय हा अभिकर्ता यांच्यावर बंधनकारक राहील. तसेच त्याबाबतचे अलाहिदा शपथपत्र (हमीपत्र) संबंधितअभिकर्त्यामार्फत घेण्यांत यावे. तसेच अभिकर्ता यांनी बँक गॅरंटी मार्फत दिलेली सुरक्षा रक्कम रू.८,८०,००,५००/- (रूपये आठ कोटी ऐंशी लाख पाचशे मात्र) महानगरपालिकेने अभिकर्त्यास देवु नये व अभिकर्त्यास सदरची रक्कम मा.स्थायी समितीचा निर्णय होवु पावेतो मागणी करणार नाही, याबाबतचे अलाहिदा हमीपत्र घेण्यांत यावे.

सबब शासन निर्णय व महानगरपालिकेने केलेले करार व इतर सर्व बाबी लक्षात घेवुन आपण योग्य तो आपल्यास्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. अशाबाबत अभिप्राय दिलेला आहे.

दि.१ जुलै २०१२ पासु महानगरपलिका हद्दीत स्थानिक संस्था कर नव्यानेच सुरु होत असल्याने सदर कराची अंमलबजवणी करीता महानगरपालिकेचा कुशल अधिकारी व कर्मचा-यांची नेमणुक करण्यात आलेली आहे, पारगमन शुल्काची वसुली महानगरपालिके मार्फत करावयाची झाल्यास त्या करीता १०० कमचा-यांची नेमणुक करावी लागणार असुन त्याकरीता महनगरपालिकेच्या इतर विभागातील कर्मचारी घ्यावे लागतील , यामुळे इतर विभागातील कामावर त्याचा विपरीत परीणाम होईल व वसुलीच्या प्रमाणात ही घट येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पारगमन शुल्काची अभिकर्त्यामार्फत करावयाची झाल्यास खालील प्रमाणे देकार रक्कम निश्चीत करता येईल.

| | | |
|---|---|---|
| १ | दि. १.४.२००८ ते ३१.३.२००९ अखेर मन.पा मार्फत केलेला वसुल (सोबत - तक्ता ) | रु. १६,४२,११,५०० /- |
| २ | दि २३.६.२०१२ अन्वये जकात अभिकर्त्याने प्रस्तावित केलेली वार्षीक रक्कम . सोबत - तक्ता | रु. १७,६५,३५,६८४ / |
| ३ | मनपा कर्मचा-यामार्फत सर्व्हे नुसार अंदाजे पारगमन शुल्कची वसुली . सोबत - तक्ता | रु. १९,११,२२,७६० /- |

वरील सर्व बाबीचा विचार करता पारगमन शुल्काचे मनपा चे कर्मचा-यांनी केलेल्या सर्व्हे नुसार दैनंदीन सरासरी रक्कम रु.५,२३,६२४ /- इतकी वसुली होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यानुसार होणारी अंदाजे वार्षीक देकार रक्कम रु. १९,११,२२,७६० /- गृहीत धरण्यास हरकत नाही , त्यासोबत वसुलीसाठी होणारा वार्षीक खर्च खालील प्रमाणे

मनपा कर्मचा-यामार्फत सर्व्हे नुसार अंदाजे पारगमन शुल्कची वसुली - रु. १९,११,२२,७६० /-
वजा कर्मचा-यावरील वार्षीक आस्था. खर्च रु. - रु. १,४८,९२,००० /-

एकुण --------------------
रु. १७,६२,३०,७६० /-

वजा मेटेनन्स चार्ज वार्षीक ( फोन , इलेक्ट्रीक , जागा भाडे ,
वाहन व इतर रु. २५,२०,०००/-

-------------------

एकुण र. १७,३७,१०,७६० /-

त्यामुळे ही रक्कम वजा जाता वार्षीक रक्कम रु. १७,३७,१०,७६०/- इतकी मिळणे अपेक्षीत आहे. त्यानुसार एका महिन्याकरीता येणारी रक्कम रु. १,४४,७५,८७० /- अशी अपेक्षीत आहे.

प्रस्तुत बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधि. १९४९ अनुसुची ड मधील प्रकरण ८ कराधान नियम ३५ अन्वये मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे अत्यावश्यक आहे परंतु सद्यस्थितीत आचार संहीता लागु असल्याने व तात्काळ निर्णय घेणे जरुरी असल्याने मा. स्थायी समितीच्या निर्णयास अधिन राहुन तो पर्यंतच्या कालावधीसाठी विपुल ऑक्ट्राय सेंटर यांना वरील रक्कमेवर पारगमन शुल्क वसुलीस परवानगी देणे योग्य वाटते , तत्पुर्वी संबंधीतंची या रक्कमेस संमती घेणे व ही परवानगी पुढील अटी व शर्तीस अधिन राहुन देण्याचे असल्याने त्याबाबत स्विकृती बाबत शपथपत्र घेणे योग्य राहील , अटी व शर्ती पुढील प्रमाणे.

१) पारगमन शुल्क वसुली संदर्भातील उर्वरीत कालावधीचा मक्ता व देकार रक्क मनपा स्थायी समिती यांच्या मान्यतेच्या अधीन राहील .
२) या संदर्भातील निर्णयाबाबत आपण कोणतीही नुकसान भरपाई मागणार नाही.
३) उपरोक्त निर्णयानुसार मक्ता कालावधी आपणास कळविण्यात येईल.
४) जकात व पारगमन शुल्क वसुलीचा करारनामा व बॅक गॅरेंटी उपरोक्त निर्णया पर्यंत कायम ठेवण्यात येत आहे.
५) मनपाने यापुर्वीच ठरविलेल्या दरानुसार पारगमन शुल्क वसुली करणे बंधनकारक राहील
६) यासंदर्भात मा. शासनाकडुन मनपास काही आदेश झाल्यास ते आपणासही बंधनकारक राहील

प्रस्तुत प्रकरणी पुढील योग्य त्या आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, जकात अधिक्षक यांनी पृष्ठ क्र.१ ते ५ मध्ये समाविष्ठ केलेले मुद्दे- पारगमन शुल्क वसुली बाबतचा प्रस्ताव योग्य वाटतो त्यावर निर्णय घेण्यास्तव सादर.

यावर मा. उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्र. जकात अधिक्षक यांचा पारगमन शुल्क वसुली जकात अभिकर्ता मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर यांच्याद्वारे करण्याचा प्रस्ताव खालील कारणाने व प्रस्तावातील नमुद बाबी मुळे योग्य वाटते.

१] स्थानिक संस्था कर लागु झाल्याने त्यासाठी मनपातील कर्मचारी नियुक्त करणे अत्यावश्यक असल्याने पारगमन शुल्क वसुलीसाठी स्वतंत्र कर्मचारी उपलब्ध करणे कठिण आहे.

२] मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर यांचा जकात व पारगमन शुल्क वसुली मक्ता करारनाम्यानुसार व कार्यादेशानुसार दि. ३०/११/१२ पर्यत असल्याने कायदेशीर प्रश्न उपस्थित होणार आहे.

३] मनपा विधी सल्लागार यांच्या मार्गदर्शनानुसार पारगमन शुल्क वसुली अभिकर्त्याद्वारे मा.स्थायी समितीच्या मान्यतेच्या / निर्णयाच्या अधिन राहून करणे योग्य होईल.

४] जकात वसुली बंद होणार असल्याने L.B.T. द्वारे संकलीत होणा-या कराची रक्कम अनिश्चित असल्याने मनपापुढे आर्थिक पेचप्रसंग निर्माण होणार आहे. सबब अभिकर्त्याद्वारे निश्चित स्वरूपाची रक्कम प्राप्त होत असल्याने आर्थिक नियोजन करण्यास मदत होईल.

५] पारगमन शुल्क मासीक रक्कम निश्चित करताना जास्तीत जास्त अंदाजीत होणारी वसुली प्रस्तावान गृहीत धरण्यात आली आहे.

६] जकात वसुली संदर्भातील बॅक गॅरेंटी स्थायी समितीच्या निर्णयापर्यत कायम राहील.

सबब प्रस्तावीत प्रमाणे पारगमन शुल्क वसुली करण्यासाठी प्रस्तावीतप्रमाणे मासीक रक्कम देण्यांस संमती व अटी / शर्ती स्विकारत असलेबाबत हमीपत्र मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर यांच्याकडून मागविण्यांस हरकत नाही. तथापी प्रस्तावानुसार मान्यता असलेस आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त यांची अभिप्राय की, प्र. जकात अधिक्षक यांची टिपणी व त्यावरील मु.ले.प. व उपायुक्त (सा.) यांचे अभिप्राय अवलोकन केले. त्यानुसार प्राप्त परिस्थितीत अ मध्ये नमूद केलेनुसार मे. स्थायी समितीचे निर्णयास अधिन राहुन संबंधित विपुल ऑक्ट्रॉय सेंटर यांना पुढील आदेश होईपावेतो पारगमन शुल्क वसुली परवानगी देता येईल. मात्र या संदर्भात संबंधित अभिकर्त्याची लेखी संमती व हमीपत्र प्राप्त करून सादर करावे.

जकात विभाग दिनांक २९/६/२०१२

फेरसादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की , अहमदनगर महानगरपालिकेने संदर्भ क्र. १ चे पत्रामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती क्र. १ ते ६ यांस अधिन राहुन तसेच मासीक देकार रक्कम रु. १,४४,७५,८७० /- नुसार पारगमन शुल्क वसुली करण्यास तयार असल्यास तशी संमती अटी व शर्ती स्विकारीत असल्याबाबत हमीपत्र तात्काळ महानगरपालिकेकडेस सादर करण्याविषयी कळविण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने संदर्भीत पत्र क्र. १ मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती क्र. १ ते ६ पैकी अट क्र.२ वगळुन उर्वरीत अटी व शर्तीस अधिन राहुन पारगमन शुल्क वसुली मासीक रक्कम रु. १,४४,७५,८७० /- नुसार करण्यास तयार असल्याबाबत जकात अभिकर्ता मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर यांनी संदर्भ क्र. २ नुसार संमती दर्शवुन सोबत हमीपत्र सादर करून संदर्भ क्र.१ मधील अट क्र. २ बाबत- आम्ही व्यावसायीक दृष्टीकोन विचारात घेवुन महापालिकेस मोठी रक्कम देवु केली असल्याने नैसर्गीक न्यायास अनुसरून उक्त अट क्र.२ वगळण्याविषयी विनंती केलेली आहे.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अनुषंगाने मासीक देकार रक्कम व मक्ता कालावधी मा.स्थायी समितीच्या निर्णयार्च अधिन असल्याने नैसर्गीक न्यायतत्वानुसार त्यांचा हक्क कायम ठेवण्यास हरकत नाही. प्रस्तुत प्रकरणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधि. १९४९ अनुसुची"ड" मधील प्रकरण ८ कराधान नियम ३५ अन्वये मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे अत्यावश्यक आहे .

तथापी सद्यस्थितीत आचार संहीता लागु असल्याने व तात्काळ निर्णय घेणे जरूरी असल्याने मा.स्थायी समितीच्या निर्णयास अधिन राहुन तो पर्यंतच्या कालावधीसाठी विपुल ऑक्ट्राय सेंटर यांना वरीलप्रमाणे प्रस्तावात नमुद केलेल्या मासीक रक्कमेवर पारगमन शुल्क वसुलीस मान्यता देउन त्यानुसार संबंधीतांस आदेश निर्गमीत करून कार्योत्तर मंजुरीस्तव मा.स्थायी समितीकडेस सविस्तर प्रस्ताव सादर करणे योग्य होईल. सबब आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्य लेखा परीक्षक यांचा अभिप्राय की, जकात अधिक्षक अहमदनगर महानगरपालिका यांनी सादर केलेला प्रस्तावावर निर्णय घेण्यास सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावितप्रमाणे मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर यांचे संमतीपत्र व अटी / शर्ती स्विकास असलेबाबत हमीपत्र मान्य करून पारगमन शुल्क वसुली संबंधीत अभिकर्त्यामार्फत मासीक रक्कम रू. १,४४,७५,८७०/- आकारून करण्यास परवानगी पत्र देण्यास

हरकत नाही. तसेच तसा प्रस्ताव मा.स्थायी समितीस निर्णयास्तव सादर करणे योग्य सबब त्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त यांची अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार मे.विपुल ऑक्ट्राय सेंटर यांचे संमतीपत्र व हमीपत्राचे अवलोकन केले. त्यानुसार मे. स्थायी समितीचे निर्णयास अधिन राहून अहवालात नमूद रक्कम आकारून म.न.पा. क्षेत्रात पारगमन शुल्क वसुलीस परवानगी देणेत येते. नमूद बाब मे.सभापती, स्थायी समिती यांचे तत्काळ निदर्शनास आणणेत यावी. नमूद परवानगी ही पुढील आदेश होइपावेतो देणेत येते.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट व फेरसादर मा.आयुक्त सो.,उपायुक्त (सा.),मुख्यलेखापरीक्षक यांचे अभिप्रायासह मा.स्थायी समिती पुढे निर्णयासाठी सादर.

तथापि यासंदर्भामध्ये सदरचे प्रस्तावाबाबत ३३ मा. नगरसेवकांचे मा. महापौर व मा.आयुक्त साहेब यांना दिलेले दिनांक २/७/२०१२ रोजीचे निवेदन तसेच मा.स्थायी समितीचे चार सदस्य यांचे पत्र व मा.आयुक्त साहेब यांचे जा.क्र.साप्रवि ६०७ दिनांक ५/७/२०१२ अन्वये नगरसचिव विभागाकडेस पत्र त्यानुसार नगरसचिव यांनी मा.महापौर सो. यांचेकडेस मा.स्थायी समितीकडील निर्णयासाठी पाठविलेले सदरचे प्रस्ताव मा.महासभेमध्ये निर्णय घेणेकामी मा. महासभा बोलविणे करीता आदेश होणे कामी दिनांक ०७/०७/२०१२रोजी सादर केला तो पुढीलप्रमाणे

अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर
नगरसचिव विभाग दिनांक७/७/२०१२

प्रति,
मा. महापौर साहेब,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC)नियुक्तीकरिता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. **व** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत पारगमन शुल्क वसुलीकामी दिनांक १/७/२०१२ पासून मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर यांना पारगमन शुल्क वसुलीकामी मा.स्थायी समितीच्या निर्णयास अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात दिलेला आहे.व पारगमन शुल्क वसुली ठेक्याबाबत मा.विद्यमान ३३नगरसेवक व मा.स्थायी समितीचे चार सदस्य यांनी सदर बाबतीत चर्चा करण्यासाठी विशेष महासभेची मागणी केलेली आहे.त्याअनुषंगाने सदरची बाब ही महानगरपालिकेच्या आर्थिक हितसंबंधाची असल्याने विशेष सभा सदर प्रस्तावात व निर्णयासाठी घेणे बाबत...

संदर्भ :- १] मा.सौ. गितांजली काळे, उपमहापौर व इतर ३२ मा. नगरसेवक यांचे दिनांक २/७/२०१२ रोजीचे निवेदन.

२] मा.स्थायी समितीच्या चार सदस्यांचे दिनांक ०२/०७/२०१२ रोजीचे पत्र.

३] मा.आयुक्त साहेब ,अ.नगर मनपा यांचे जा.क्र. साप्रवि ६०७ दिनांक ५/७/२०१२ चे पत्र.

सादर,

उपरोक्त विषयाचे संदर्भानुसार विनंती अहवाल देण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती करिता मागविण्यांत आलेल्या निविदाचा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. व अहमदनगर महानगरपालिका हद्दीत पारगमन शुल्क वसुलीकामी ठरविलेल्या रकमेस दिनांक १/७/२०१२ पासून मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर यांना पारगमन शुल्क वसुली ठेका देणे व ठेक्याचा कालावधी ठरविणेबाबतचे विषय निर्णयासाठी मा. स्थायी समितीकडे आलेले आहेत. परंतु याबाबत महानगरपालिकेच्या ३३ नगरसेवक यांनी PMC नेमणे बाबतचा तुलनात्मक तक्त्याचा प्रस्ताव कालबध्द स्वरुपाचा असल्याने या बाबत लवकरात लवकर निर्णय घेणे अपेक्षित आहे तसेच पारगमन फी वसुली करणे कामी अभिकर्ता नियुक्त करणे महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्याकरीता निविदा मागविणे बाबत कार्यवाही केल्यास पारदर्शकता निर्माण होवून यामध्ये स्पर्धा होणार आहे. यातून महानगरपालिकेचे उत्पन्नात निश्चित वाढ होईल अशी अपेक्षा आहे. याकरीता निविदा मागविणे बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.महासभेपुढे पाठविण्याबाबतचे निवेदनाची प्रत इकडेस दिलेली आहे.

मा.शासनाचे अर्थ सहाय्य असलेली महत्वपुर्ण एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती करिता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्त्याबाबत योग्य तो निर्णय तातडीने होणे अत्यावश्यक आहे. सदरची योजना ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे विहित मुदतीत पुर्ण करणे हे महानगरपालिकेवर बंधनकारक आहे तथापि विहित मुदतीत केंद्र शासनाचे अनुदान अथवा सवलती महानगरपालिकेस मिळण्यासाठी व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्याकरीता तसेच पारगमन शुल्क वसुली बाबत योग्य तो निर्णय तातडीने होणे अत्यावश्यक आहे. उपरोक्त दोन्ही बाबी या महानगरपालिकेच्या आर्थिक हितसंबंधाशी निगडीत आहे. व त्यावर तातडीने निर्णय होणे गरजेचे आहे. तथापि दोन्ही विषयाबाबतची चर्चा ही मा.स्थायी समितीकडे होणे आवश्यक व गरजेचे आहे. तथापि मा.स्थायी समितीचे दिनांक १/७/२०१२ पासून ८(आठ) सदस्य निवृत्त झालेले आहेत. व मा.स्थायी समितीच्या रिक्तपदी आठ सदस्यांची नियुक्ती करणे व तद्नंतर मा.सभापतीची निवड होणे बाकी असलेने मा.स्थायी समितीचे कामकाज पुर्ववत होणेसाठी बराच कालावधी लागणार आहे. वरील दोनही विषयाबाबत तातडीने चर्चा करण्यासाठी व योग्य तो निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेच्या ३३ मा.नगरसेवकांनी व मा.स्थायी समितीच्या चार सदस्यांनी विशेष महासभेची मागणी केलेली आहे. त्याबाबत चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्याची मागणी केलेली आहे. उपरोक्त सर्व बाबींचा सर्व निकष व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" प्रकरण दोन मधील तरतुदीनुसार मा. महानगरपालिकेचे कामकाज, कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी कलम (ड) मधील तरतुदीनुसार सदरचे दोनही प्रस्ताव मा.महासभेमध्ये घेणे बाबत आदेश होणेस विनंती आहे. तरी याबाबत मा.महासभा काढणे विषयी तारीख व वेळ मिळणे बाबत विनंती आहे

यावर मा.महापौर सोा. यांचा आदेश की, बुधवार दिनांक ११/७/२०१२ रोजी दुपारी १.०० वा. सदर दोनही विषयासाठी मा. विशेष सर्वसाधारण सभा काढण्यात यावी.

--**--

**चर्चा :-**

विषय क्रमांक १३ चे वाचन सुरु होत असतांनाच कै.बा.दे.दवाखाना विषय निघाला.

**मा.श्री.संग्राम जगताप** : कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये श्रीमती भुकन यांच्या मृत्यूची घटना घडलेली आहे. सदरची महिला रूग्णालयात दाखल होते वेळी तिला कुठल्याही प्रकारचा त्रास नव्हता. ती आजारी नव्हती. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यातील डॉक्टराच्या हलगर्जीपणामुळे सदर महिलेचा मृत्यु झालेला आहे. या घटनेस सर्वस्वी डॉक्टर जबाबदार आहेत. हा विषय गंभीर विषय आहे.महिलेच्या मृत्यूस जबाबदार असणा-या डॉक्टरवर जबाबदारी निश्चीत करून त्यांच्यावर कार्यवाही करावी. मागील काळात रक्तपेढीतील नादुरूस्त साधनामुळे तेथील रक्त पिशव्या रक्तातील घटक कमी अधिक प्रमाणात झाल्याने रक्त पिशवी खराब झाल्या. म्हणून संबधीत असणा-या डॉ. श्री बोरगे यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यांत आलेली आहे. आज डॉक्टरांच्या हालगर्जीपणामुळे एका महिलेचा मृत्यू होवून कुंटुंब उध्वस्त झालेले आहे. त्यास सर्वस्वी डॉ.श्री राजूरकर जबाबदार आहेत. त्यांना तात्काळ निलंबीत करण्यात यावे.

**मा.श्री.किशोर डागवाले** : मा.श्री संग्राम जगताप यांनी मांडलेला विषय गंभीर आहे. याची दखल घेण्यात यावी सदर महिला रूग्णालयात दाखल होतांना तिची प्रकृती चांगली होती. शस्त्रक्रिया करतांना अति रक्तस्त्राव झाल्याने सदर महिलेचा अंत झालेला आहे. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात कार्यरत असणारे डॉ.श्री राजूरकर हे अतिशय निष्क्रीय आहेत. त्यांना ताबडतोब निलंबीत करण्यात यावे.

**मा.श्रीमती. किरण उनवणे** : कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये घडलेल्या घटने बाबत डॉ.श्री राजूरकर यांनी माहिती द्यावी. सदर घटनेस जबाबदार असणा-या डॉक्टरांना ताबडतोब निलंबीत करण्यात यावे.

**मा.श्रीमती. संगीता खरमाळे** : कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना हा गरिब वर्गातील लोकांकरिता आहे. त्या ठिकाणी गरिबातील गरिब लोक जात असतात. सदर दवाखान्यातून नागरिकांना कुठल्याही प्रकारच्या सुविधा चांगला पध्दतीने दिल्या जात नाही.

**मा.श्री. बाळासाहेब पवार** : मी रूईछत्तीशी या ग्रामीण भागात गेल्या नंतर तेथे मला कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याचा एका रूग्णाने अनुभव सांगितला पेशंट ॲाडमिट केल्यानंतर त्या पेशंटचा रक्तस्त्राव जादा झाल्याने पेशंट दुस-या खाजगी दवाखान्यामध्ये हलवण्यास सांगण्यात आले.खाजगी दवाखान्यामध्ये सदरचे पेशंट दाखल करून घेण्यांस ब-याच ठिकाणी रूग्णाची परिस्थिती पाहून नकार देण्यात आला. सदरच्या काळात रूग्णाची परिस्थिती अधिकच बिकट होत गेली.अशा प्रकारच्या अनेक वाईट घटना कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात घडतात. दोषी डॉक्टरांवर त्वरीत निलंबनाची कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.श्री.निखील वारे** : मनपातील सर्व पदाधिकारी महिला असूनही कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये महिला बाबत अशा प्रकारे घटना घडतात.

**श्री. डॉ.राजूरकर** : कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये गोरगरिब वर्गातील महिलांना प्रसुतीसेवा देत आहोत. सदरच्या इमारतीची अत्यंत दूरवस्था झालेली आहे. सदर ठिकाणी कुठल्याही प्रकारच्या सोयीसुविधा नाहीत.स्टाप संदर्भातही अनेक अडचणी आहेत. तीन डॉक्टर सर्व बाळासाहेब देशपांडे दवाखाना सांभाळण्याचा प्रयत्न करीत आहे. डॉक्टरी सेवा देतांना अनेक प्रकारचे कॉम्प्लिकेशन निर्माण

होतात. खाजगी दवाखान्यामध्ये तातडीने तज्ञ डॉक्टर उपस्थित असतात. त्या सोबतच लागणा-या तातडीच्या सेवा त्या ठिकाणी तात्काळ मिळतात. त्यामुळे खाजगी रूग्णालयात पेशंट दगावण्याचे प्रमाण कमी आहे. चांगल्या प्रकारे सेवा देण्याचा प्रयत्न आपल्या कडून केला जातो.

**मा.श्रीमती. संगीता खरमाळे / मा.श्रीमती. किरण उनवणे** : सदर महीलेचा जादा प्रमाणात रक्तस्त्राव होत असतांनाही सदर महिलेवर शस्त्रक्रिया कशी केली त्याची जबाबदारी का घेतली.

**मा.श्री. किशोर डागवाले** : सदर महिलेच्या मृत्यू बाबत डॉ.राजूरकरांनी खुलासा करावा.

**डॉ.श्री.राजूरकर** : सदर महिला पेशंट दि.४/७/२०१२ रोजी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये दाखल झाली होती. सदर महिलेचे ब्लड युरिन तपासणी केलेली होती. सदर तपासणीत सदर महिलेला अर्धवट गर्भपाताची लक्षणे दिसून आली. सदर महिला क्युरेटींगसाठी ॲडमिट करून घेतली. त्यातच कुंटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करावयाची होती . पेशंट चांगल्या स्थितीत होते.एका वेळी दोन शस्त्रक्रिया करावयाच्या होत्या.याबाबत सदर रूग्णाच्या नातेवाईकांना कल्पना दिलेली होती.

**मा.श्री. किशोर डागवाले** : सदर महिलेच्या मृत्यू बाबतचा जिल्हाशल्यचिकीत्सक यांचा पीएम अहवाल वाचून दाखण्यात यावा.

**श्री डॉ.राजूरकर** : सदर महिलेच्या ह्दयाचे ठोके कमी जास्त प्रमाणात पडत होते. ते व्यवस्थित सुरू करण्यासाठी रूग्णास इंजेक्शन वगैरे देण्यांत आले. त्यावेळी शस्त्रक्रिया बंद करण्यात आली. जादा रक्तस्त्राव झाल्याने रक्तदाब कमी पडत होता. त्या बाबत प्रयत्न करून त्यात यश आले नाही.

श्री किशोर डागवाले : सदर महिलेच्या मृत्यूस डॉ.राजूरकरच जबाबदार आहे.

**मा.श्रीमती. किरण उनवणे** : कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या मध्ये सदर महिलेवर उपचाराची सुविधा नव्हती. तर सदरचे पेशंट दहा मिनीटात जिल्हा रूग्णालयात का हलविण्यात आले नाही. दोषी डॉक्टरावर त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.आयुक्त सो**. : कै.बाळसाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये मृत्यू मुखी पडलेल्या महिलेचा पी.एम. अहवाल प्राप्त झालेला नाही. पी.एम.अहवालाची तज्ञ डॉक्टरांकडून छानणी होवून आल्यानंतर पुढील कार्यवाही करावी लागेल.

**मा.श्रीमती. मालनताई ढोणे** : कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये सोयीसुविधाचा अभाव आहे. तेथे कर्मचारी ,डॉक्टर , यांची संख्या कमी आहे. याबाबत प्रशासनाकडे मागणी केली होती का पालिकेत सर्वच ठिकाणी कामगाराची संख्या कमी आहे.

**मा.आयुक्त सो**.: मी हजर झाल्यानंतर बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये भेट दिली आहे. त्याठिकाणी असणा-या त्रुटी जाणून घेतल्या आहे. त्या पूर्ण करणे बाबतच्या संबधीत विभागांना सूचना दिलेल्या आहेत. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे तीन डॉक्टर काम करतात. डॉक्टर,नर्सेस यांची संख्या अतिशय कमी आहे. आस्थापना विभागा मार्फत डॉक्टर व नर्सेस भरणे बाबत कार्यवाही सुरू केलेली आहे. त्यास साधारण एक महिन्याचा कालावधी लागेल.

**मा.श्री. किशोर डागवाले :** डॉ.राजूरकर हे नगरसेवकांचे फोन कॉल घेत नाहीत. नगरसेवकांशी उर्मटपणे वागतात.

**मा.श्रीमती. मालनताई ढोणे :** महिला व बाल कल्याण समितीचा निधी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात सोयीसुविधा व साधन सामुग्री उपलब्ध करून देणे करिता वर्ग करण्यांत आला होता. परंतु सदरचा निधी प्रशासनाने लॅप्स होवू दिला. परंतु सदर ठिकाणी काम केले नाही.

**मा.आयुक्त सो. :** कै.बाळासाहेब देशपाडे दवाखान्यातील घटने संदर्भात डॉक्टरांच्या तज्ञ समितीचा अहवाल आल्यानंतर निर्णय घेवून.

**मा.श्री.संग्राम जगताप :** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यातील घटनेबाबतचा विषय येत्या दि.१६/७/२०१२ च्या सर्वसाधारण सभेच्या वेळी घेण्यांत यावा.

**मा.श्री. निखील वारे :** दारिद्रय रेषेखालील लोकांना देण्यात येणा-या शस्त्रक्रियेच्या सवलती सर्व ठिकाणी चालु आहेत काय त्या ठिकाणी आपण नेहमी पाहणी करतात का मी ब-याच डॉक्टरांशी चर्चा केली असता महानगरपालिकेने त्यांचे पैसे थकविल्यामुळे त्या दवाखान्यांनी शस्त्रक्रिये संबधी सवलती देणे बंद केले आहे. दारिद्रय रेषेखालील लोकांच्या शस्त्रक्रिया काही काळा करिता बंद केल्या बाबतचा बोर्ड लावलेला आहे.

**डॉ.श्री. राजूरकर :** दारिद्रय रेषेखालील लोकांच्या शस्त्रक्रिये करिता आपण पैसे देतो. दवाखान्याची पाहणी करून ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया करणे बंद केलेले आहे त्यांच्यावर कार्यवाही करतो. आमच्या कडे अशा बाबत आजपर्यत एकही तक्रार आलेली नाही.

**मा.श्री. विनीत पाअुलबुधे :** आपल्या कडे तक्रार आली तरच आपण कार्यवाही करणार का नियमीत पाहणी करणे आपले काम नाही का संबधीतांना योग्य ती समज देण्यात यावी . सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने नागरिकांना अनेक साथीच्या रोगांना तोंड दयावे लागत आहे. त्या बाबत आपण माहिती घेतली का आरोग्यधिकारी म्हणून आपली जबाबदारी नाही का

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :** मी काही काळापूर्वी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे पाहणी केली असता त्या ठिकाणी पेशंट ॲडमिट कार्ड व डिस्चार्ज कार्ड उलब्ध नव्हते. आम्ही आमच्या पैशातून त्याठिकाणी कार्ड छपाई करून दिलेली आहे.आजपर्यत पालिकेने कार्ड छापून दिलेले नाहीत.

**मा.श्री.निखील वारे :** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यातील गैरसोयी बाबत तातडीने एक बैठक बोलावण्यात यावी.

**मा.श्रीमती. किरण उनवणे :** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे या सर्व अडचणी एक वर्षापासून चालू आहे. महिला बाल कल्याण समितीचा निधी त्या करिता देण्यात आला होता. तरीही त्या ठिकाणी काम झालेले नाही. या बाबत मा.उपायुक्त (कर) यांनी उत्तर द्यावे.

**मा.आयुक्त सो. :** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे एक महिन्या पर्यत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्या बाबत कार्यवाही करू.

**उपायुक्त (कर) :** महिला व बालकल्याण समितीचा निधी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे सोयीसुविधा व साहित्य खरेदी कामी  वापरणे बाबतचा ठराव झाल्यानंतर २ महिन्यांनी प्रशासनाकडे आला. त्यानंतर सदर ठराव १० दिवसात पुढील संपूर्ण खरेदी प्रक्रिया करणे शक्य नव्हते. तसेच कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे मशनरी खरेदी बाबतचे टेंडर प्रसिध्द केल्या नंतर त्यास प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर लगेचच आर्थिक वर्ष ३१ मार्च आल्याने संपूर्ण काम करता आले नाही. तरी त्यात १० ते १२ लाखची खरेदी झालेली आहे. प्रशासनाकडून महिला बाल कल्याणच्या निधीबाबत कुठल्याही प्रकारची दिरंगाई झालेली नाही.

**मा.महापौर सो. :** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे पदाधिकारी समवेत मा.आयुक्त, यांनी भेट दिलेली आहे.येथील कामाबाबत संबधीतांना सूचना केलेल्या आहेत. पूर्ण दवाखान्याच्या नूतनीकरणाबाबत सूचना केलेले आहेत. १ महिन्याच्या कालावधीत त्या ठिकाणी काम पूर्ण होणार आहे. पुढील विषय घेण्यांत यावा.

**मा.श्री.गणेश भोसले :** पारगमनचा विषय जशा तातडीने महासभेपुढे घेतला तशाच पध्दतीने इंजिनिअर भरती करणे बाबतचा विषय तातडीने घेण्यात यावा.इंजिनिअर संख्या अतिशय कमी असल्याने वॉर्डात कुठलेही काम योग्य प्रकारे पूर्ण होत नाही.

**मा.महापौर सो. :** इंजिनिअर भरती बाबत प्रशासनाचा पाठपुरावा चालू आहे.

**मा.आयुक्त सो. :** सदर विषया बाबत संबधीत विभागाची बैठक घेतलेली आहे. ६ महिन्याच्या कालावधी करिता कंत्राटी पध्दतीने मानधनावर इंजिनिअर नियुक्त केले जातील. त्यांचे मानधन कमी असल्याने मनपात सेवा देण्यास इंजिनिअर येत नाहीत. त्याचे मानधन वाढीबाबतचा विषय स्थायी समितीकडे आहे. त्यांची मंजूरीस आधिन राहून इंजिनिअर भरती करत आहोत.

विषय क्रमांक १३ :

**मा.श्री.किशोर डागवाले :** मनपा हद्यीत एलबीटी चालु होणार असलया बाबतचे पत्र महानगरपालिकेस १ महिन्या पूर्वी आलेले आहे. त्याची सन्माननीय नगरसेवकांना कल्पना दिलेली नाही. एलबीटी बाबत नगरसेवकांना काहीही माहिती नाही. १ महिन्यात कुठल्याही प्रकारे कार्यवाही केली नाही. एकदमच एलबीटी लागू करून वसूल चालु केली. ते कायदयात बसते का

**मा.श्री.संभाजी कदम :** १ महिन्या पूर्वी पासून अहमदनगर शहरात जकाती ऐवजी एलबीटी चालू होणार या बाबत चर्चा चालु होती. शहरातील व्यापारी व नगरसेवक यांची बैठक घेतलेली आहे. स्थायी समिती अस्तित्वात असतांना विषय घेतला नाही. पारगमन वसुलीसाठी चार दिवस महानगरपालिकेने स्वतःचे कर्मचारी बसवलेले होते. यापूर्वी ठेका देतांना आस्थापना खर्च व मेंन्टनस खर्च लावला होता का खर्च लावणेचे काही कारण नाही. मनपाचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे.

**मा.श्री. विनीत पाउलबुधे :** एलबीटी लागू करणे बाबतचे पत्र १ महिन्या पूर्वी आले आहे. एवढया उशीरा सदर पत्रावर कार्यवाही करण्याचे कारण काय स्थायी समितीच्या अधिन राहून निर्णय कसा घेतला. स्थायी समितीचा निर्णय तुम्हांस काय माहित ७ जून पासून कार्यवाही का केली नाही. पारगमन वसुलीचे विपूल एजन्सीला पत्र देण्याचे कारण काय ? त्यांच्या सोबत केलेला करार रद्द करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना आहे. संबधीत ठेकेदार दि.१/७/२०१२ पासुन पारगमन वसुली करतात. ते बेकायदेशीर आहे.

**मा.आयुक्त सो. :** अहमनगर महानगरपालिकेचा कार्यभार घेतल्यानंतर एलबीटीचे प्रशिक्षणासाठी महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी यांना पाठविण्यात आले होते. जकात अभिकर्त्याचा जकात वसुलीचा माहे नोव्हेंबर अखेर करार होता. जकात व पारगमन वसुलीचे टेंडर एकत्रच मागविलेले होते. पारगमन वसुलीची रक्कम जकात ठेक्यामध्ये वेगळी दर्शविणे आवश्यक होते. एलबीटी वसूल नविनच चालु करावयाचे आहे. त्यासाठी दहा लोकांना ट्रेनिंग दिलेल्या आहे. एलबीटीसाठी ८१ लोकांची आवश्यकता आहे. वर्ग १ चे ८ वर्ग २ चे ५८ वर्ग ३ चे ४६९ कर्मचारी आहेत. त्यापैकी २१३ कर्मचारी तांत्रिक पदावरील आहे.विविध विभागात कर्मचारी कमी आहेत. एलबीटी हे प्रमुख उत्पादनाचे साधन

होणार आहे. पारगमन पूर्वी कर्मचा-या कडून गोळा केले जात होते. त्यात वेगवेगळे अनुभव आलेले आहे. पारगमनचे टेंडर काढण्यासाठी दीड महीन्याचा कालावधी लागणार आहे. मनपा कर्मचारी बसून पारगमन वसूली करणे. त्यापासून येणारा पैसा व यासाठी लागणारा कर्मचारी खर्च पाहिला.पारगमनचा वसुली ठेका पध्दतीने देणे बाबतची कार्यवाही दोन दिवसात होणे शक्य नसल्याने स्थायी समितीच्या निर्णयास आधिन राहून ९० कोटी जकात ठेक्याची बँक गॅरंटी ठेवून पारगमन वसुलीचे काम दिलेले आहे.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :** दि.७ रोजी एलबीटी वसूली बाबतचे पत्र आल्यानंतर त्याच वेळी तयारी करणे आवश्यक होते. आज पर्यत त्याची तयारी झाली असती. सदरचा विषय मा.स्थायी समिती कडे पाठविणे आवश्यक होते. आजच्या विषयाला कायदेशीर आधार आहे काय हे पूर्णःता मनपा हिता विरूध्द आहे. पारगमन ठेक्याची रक्कम चुकीची ठरविलेली आहे.

**मा.श्री. संभाजी कदम :** ४ दिवसांच्या कलेक्शनवरुन पारगमन वसुलीचा अंदाज काढणे चुकीचे आहे. वाहनाबाबत योग्य माहिती काढलेली नाही.

**मा.श्री. निखील वारे :** सन २००९ साली पारगमन वसूल केले आहे. त्यात दरवर्षी १० टक्के वाढ धरून पारगमन वसुलीची रक्कम निश्चीत करणे आवश्यक होते. ४ दिवसाच्या वसुलीच्या अंदाजावर सदरची रक्कम कशी निश्चीत केली.

**मा.श्री.सचिन पारखी :** सन २००८-२००९ च्या पारगमन वसूलीच्या तुलनेत आजच्या जकात वसुलीच्या ठेक्याच्या रकमेनुसार पारगमन वसुलीसाठी दिलेली रक्कम अतिशय कमी आहे.

**मा.श्री.संग्राम जगताप / मा.श्री.विनीत पाऊलबुधे :** पारगमन वसुलीची रक्कम निश्चीत करणे बाबतचा विषय मनपा सभेचा असतांना परस्पर निर्णय घेतल्याने मनपा सभेचा अवमान केल्या सारखे आहे. नगरसेवकाबद्दल वृत्तपत्रात उलट सुलट बातम्या ठेकेदार देतात त्या देवू नयेत.

**मा.श्री. संभाजी कदम :** मनपा हद्यीत पारगमन वसुली करणे करिता तात्काळ ई -टेडरिंग करण्यात यावे.

**मा.श्री. बाबासाहेब वाकळे :** ई-टेडरिंग बाबत ७ दिवसात कार्यवाही करण्यांत यावी.

मा.महापौर यांना निवेदन दिले.

**मा.श्री. संग्राम जगताप :** आजपासून पारगमन शुल्क मनपा कर्मचा-या मार्फत वसूल करण्यांत यावे, नविन ठेकेदार नेमणे बाबत कार्यवाही करण्यात यावी.

**मा.श्री. संभाजी कदम :** पारगमन वसुली सध्याच्या ठेकेदाराला रक्कम रूपये २८ कोटी फायनल करून दयावेत.मनपा कर्मचा-याकडून वसुल करण्याचा प्रयत्न केला. परंतु वाईट अनुभव आले त्यामुळे मनपा कर्मचा-या कडून वसुली करू नये.

**मा.श्री.संजय शेंडगे / मा.श्री.संभाजी कदम / मा.श्री.उमेश कवडे / मा.श्री.सचिन पारखी :** मनपा कर्मचा-या कडून पारगमन वसुली करण्यांत येवू नये. विषय मंजूर करण्यात यावा.

**मा.श्री. विनीत पाऊलबुधे :** चुकीचा निर्णय घेतल्यास कायदेशीर कार्यवाहीस सामोरे जावे लागेल.

**मा.महापौर सो :** ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेली चर्चा पाहता ठरविणेत येते की, देशात व राज्यामध्ये प्रगत राहणीमान व वाढते शहरीकरण यातुन होणा-या विकासामुळे मागणीत वाढ होवून उत्पादन वाढत आहे. यातुन उद्योग व व्यापारी दळणवळणात या कारणामुळे वाहतुकीमध्ये वाढ होत आहे. या करीता १ वर्षासाठी पारगमन फी वसुलीची देकार रक्कम २८ कोटी रुपये रक्कमेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने तात्काळ टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यात यावी. निविदा मंजूर झाल्यानंतर कर्यारंभ आदेश दिल्या जाणा-या तारखेपासून १ वर्षासाठी पारगमन शुल्क वसुलीचा ठेका देण्यांत यावा तो पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात विपुल ऑक्टॉय सेंटर याचा पारगमन वसुलीचा ठेका सुरु ठेवणेत यावा.

--*--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेली चर्चा व याबाबत प्राप्त झालेले निवेदन पाहता ठरविणेत येते की, देशात व राज्यामध्ये प्रगत राहणीमान व वाढते शहरीकरण यातुन होणा-या विकासामुळे मागणीत वाढ होवून उत्पादन वाढत आहे. यातुन उद्योग व व्यापारी दळणवळणात या कारणामुळे वाहतुकीमध्ये वाढ होत आहे. या करीता १ वर्षासाठी पारगमन फी वसुलीची देकार रक्कम २८ कोटी रुपये रक्कमेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने तात्काळ टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यात यावी. निविदा मंजूर झाल्यानंतर कर्यारंभ आदेश दिल्या जाणा-या तारखेपासून १ वर्षासाठी पारगमन शुल्क वसुलीचा ठेका देण्यांत यावा तो पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात विपुल ऑक्टॉय सेंटर याचा पारगमन वसुलीचा ठेका सुरु ठेवणेत यावा. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापु वाकळे
अनुमोदक : मा.श्री.उमेश खंडेराव कवडे
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.